MHKO110011552024

**नियमित दिवाणी दावा क्र. ८९/२०२४ मधील निशाणी क्रमांक १७ व २० खाली आदेश**

**प्रमिला संभाजी कुंभार**

**विरुध्द**

**मारुती यशवंत कुंभर वगैरे**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी न्यायालयीन तक्रार निवारण करणेकरीता दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादी यांचे वय ७२ असून ते जेष्ठ नागरीक आहेत.

०२. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, मौजे घुणकी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर या गावात त्यांच्या मालकीचे जुने घर आहे. ते घर प्रतिवादी क्र.१ व त्यांचे चुलत बंधू भगवान बाबुराव कुंभार यांना त्यांची अडचण पाहून दिलेले आहे. सदर घराचा सिटी सर्वे क्र.७५ असा आहे. वादी श्रीमती प्रमिला संभाजी कुंभार या सिटी सर्वे क्र.७२ मध्ये राहतात. सिटी सर्वे क्र.७५ मध्ये भगवान बाबुराव कुंभार यांनी बांधकाम काढलेले होते. सिटी सर्वे क्र.७१, ७३, ७४ व ७६ मधील रहिवासींची सदर बांधकामाबाबत कोणतीही तक्रार नाही. मात्र वादी यांनी विनाकारण बांधकाम बंद ठेवणेबाबत न्यायालयात वकिलांमार्फत नोटीस पाठविलेली आहे. दावा क्र.८९/२०२४ हा प्रतिवादी यांना विनाकारण त्रास देण्याच्या उद्देशाने दाखल केलेला आहे. सदर बांधकामाशी वादी यांचा काहीही संबंध नाही. तरी बांधकाम चालू करणे बाबत ओदश व्हावे अशी विनंती केली आहे.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ही मान्य बाब आहे की, प्रतिवादी क्र.१ हे जेष्ठ नागरिक आहेत. रोजनामा चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ हे दिनांक ०६/११/२०२४ पासून गैरहजर आहेत. तसेच आज देखिल वारंवार पुकारले असता गैरहजर आहेत.

०४. प्रतिवादी यांनी मान्य केले आहे की, ते सिटी सर्वे क्र.७५ मध्ये बांधकाम करीत आहेत व सिटी सर्वे क्र.७१, ७३, ७४ व ७६ मधील रहिवासींची सदर बांधकामाबाबत कोणतीही तक्रार नाही. तसेच त्यांनी असे कथन केले आहे की, वादी हे सिटी सिर्वे क्र.७२ मध्ये रहातात. परंतू याबाबत त्यांनी कोणतेही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेले नाही. तसेच प्रतिवादी यांनी त्यांची कौफियत देखिल याकामी दाखल केलेली नाही. म्हणून प्रतिवादी यांनी दाखल केलेला अर्ज या टप्प्यावर विचारात घेता येणार नाही. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

**१.** निशाण १७ व २० कडील अर्ज नामंजूर करण्यात येत आहेत.

**Sd/-**
**( आर. एस. मोरे )**
**३रे** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
**पेठवडगाव**

**दिनांकः- १३/०६/२०२५.**
**पेठवडगाव**